सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

निवडणूक तात्काळ

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

क्रमांक- रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र. १८/का.५
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक - २/२/२०१२

प्रति,
महानगरपालिका आयुक्त,
बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, पुणे, पिंपरी-चिंचवड,
सोलापूर, नाशिक, अकोला, अमरावती, नागपूर,
सांगली-मिरज-कुपवाड व औरंगाबाद.

विषय :- महानगरपालिका सार्वत्रिक / पोटनिवडणुका- २०१२
नामनिर्देशनपत्राच्या छाननीबाबत...

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाने समक्रमांकाच्या दिनांक- १ फेब्रुवारी, २०१२ च्या पत्रान्वये मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या जागेवरून निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या नामनिर्देशनपत्राच्या छाननीसंबंधी काही सूचना दिल्या होत्या. या सूचना मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट पिटीशन क्र. ८५३/२०१२ मध्ये दि. ३१ जानेवारी, २०१२ रोजी दिलेल्या आदेशानुसार देण्यात आलेल्या होत्या.

आयोगाने दिनांक- १/२/२०१२ रोजी केलेल्या आदेशानुसार सर्वसाधारण प्रवर्गासाठी असलेल्या जागेवर दाखल झालेल्या नामनिर्देशनपत्रांची छाननी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिनांक- १/२/२०१२ व २/२/२०१२ रोजी करावयाची आहे. तसेच मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या जागेवरून निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या नामनिर्देशनपत्राच्या छाननी दिनांक- ३/२/२०१२ रोजी दुपारी १.०० वाजल्यापासून करावयाची आहे.

मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या जागेवरुन निवडणूक लढविणा-या उमेदवाराच्या नामनिर्देशन पत्रांची छाननी करताना उमेदवारांनी दाखल केलेल्या जात वैधता प्रमाणपत्रावर **अन्य उमेदवारांनी हरकत घेतल्यास** खालील गोष्टींची शहानिशा निवडणूक निर्णय अधिका-यांना करता येतील:-

१) ज्या उमेदवाराच्या जात वैधता प्रमाणपत्राबद्दल आक्षेप घेतलेला आहे अश्या उमेदवाराला किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीला प्रतिज्ञापत्र सादर करता येईल. प्रतिज्ञापत्राचा नमुना सोबत दिलेला आहे.

२) जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या अहवालात सदर उमेदवाराचे जात वैधता प्रमाणपत्र दक्षता समितीचा अहवाल घेऊन दिलेले आहे असे म्हटले असल्यास तो अर्ज वैध करण्यास हरकत नाही.

३) जो उमेदवार/प्रतिनिधी असे प्रतिज्ञापत्र करू शकणार नाही किंवा त्या उमेदवाराने सादर केलेल्या जात वैधता प्रमाणपत्राबद्दल असे प्रमाणपत्र दक्षता समितीचा अहवाल घेऊन देण्यात आलेले आहे असे जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालातही नमूद नाही अश्या उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र अवैध ठरविण्याबाबत संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी निर्णय घ्यावा.

यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक-८५३/२०१२ मध्ये दिनांक-३१/१/२०१२ रोजी दिलेला निर्णय तसेच सिव्हिल ॲप्लिकेशन क्रमांक-२८८/२०१२ मध्ये दिनाक- १/२/२०१२ रोजी दिलेल्या निर्णयाच्या प्रती राज्य निवडणूक आयोगाच्या वेब साईट www.mahasec.com वर उपलब्ध आहे. **सदर निर्णयाच्या प्रती निवडणूक निर्णय अधिकारी यांना उपलब्ध करून दयाव्यात. या न्यायालयीन निर्णयामध्ये छाननीच्यावेळी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी अवलंबवायाच्या कार्यपध्दतीबाबत जे आदेश दिलेले आहेत त्यास वर्तमानपत्रे, केबल टी.व्ही., इत्यादी मार्गाने व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.**

**जेणेकरून मागासवर्गीय उमेदवारांना प्रतिज्ञापत्र दाखल करण्यासंदर्भातील माहिती मिळू शकेल व ते छाननीच्यावेळी प्रतिज्ञापत्र सादर करू शकतील.**

महानगरपालिका निवडणुकांमधील उमेदवारांच्या नामनिर्देशनपत्रांची छाननी दिनांक- ३ फेब्रुवारी, २०१२ रोजी पूर्ण झाल्यानंतर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया दिनांक- ४ फेब्रुवारी, २०१२ रोजी करावयाची आहे.

दिनांक ६ फेब्रुवारी, २०१२ रोजी निवडणूक चिन्ह नेमून देण्याची प्रक्रिया पूर्ण करावयाची आहे.

त्यानंतर पुढील निवडणूकीच्या टप्प्यांचा कार्यक्रम म्हणजेच मतदान केंद्रनिहाय मतदारांची यादी प्रसिध्द करणे तसेच निवडणुकीसाठीचे मतदान दिनांक-१६ फेब्रुवारी, २०१२ ला घेणे हे सगळे टप्पे पूर्वी दिलेल्या आदेशानुसारच पार पाडावयाचे आहेत. **मतदानाच्या तारखेमध्ये कुठलाही बदल होणार नाही** हे स्पष्ट करण्यात येत आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

आपला,

धमाकानेड.

( ध. मा. कानेड )

अवर सचिव,

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र